(31)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): औरंगाबाद शहर **P.S.**(ठाणे): कँटोनमेंट (छावणी ) **Year** (वर्ष): 2022

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0090 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 25/03/2022 01:07 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): गुरूवार

**Time Period** (कालावधी): पहर 6

**Date From** (दिनांक पासून): 24/03/2022

**Date To** ( दिनांक पर्यंत): 24/03/2022

**Time From** (वेळेपासून): 17:35 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 17:35 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 25/03/2022 **Time** (वेळ): 01:07 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद क्र.): 005 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 25/03/2022 01:07 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): उत्तर, 3 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): बेस टि कफे हॉटेल समोर ,पानचक्की ,औरंगाबाद

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): इरफान अब्दुल्ला नाईक

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1969 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मौ वावे वडखल ता पेन,रायगड,रायगड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मौ वावे वडखल ता पेन,रायगड,रायगड,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल नं.): 91-9730118828

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | फैसल मोहमद इकबाल | | | 1. 100,अन्सार कलनी, पडेगाव,, औरंगाबाद,कँटोनमेंट (छावणी ), औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद   दिनांक 25/03/2022 मी इरफान अब्दुल्ला नाईक, वय- 53 वर्षे, व्यवसाय- खा.नोकरी रा. मौ. वावे वडखल ता. पेन जि. रायगड मोबा.क्र. 9730118828. समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी दिनांक 24/03/2022 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, औरंगाबाद येथे मला होत असलेल्या लाचमागणी बाबतची तक्रार दिली होती ती पुढीलप्रमाणे, मी वरील ठिकाणी माझ्या कुटूंबासह राहत असुन खाजगी नोकरी करतो. तसेच मी वावे वडखल मस्जिद, मौ. वावे वडखल ता. पेन जि. रायगड मस्जिदचे कमिटीचे अध्यक्ष पदावर आहे.   वावे वडखल मस्जिद, मौ. वावे वडखल ता. पेन जि. रायगड मस्जिदचे व्यवस्थापकीय समितीची फेर बदल बाबत वाद चालु असुन प्रकरण मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांचेकडे आहे. त्या बाबत दिनांक 25/02/2022 रोजी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद येथे सुनावणी ठेवण्यात आली होती. सदर सुनावणीसाठी मी व मस्जिद कमिटीवरील सदस्य श्री. सुफियान कादीर पटेल रा. मौ. वावे वडखल ता. पेन जि. रायगड व आमचे वकील ऍड. निसार अहेमद खान रा. औरंगाबाद असे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांचेसमोर मराठवाडा महसूल प्रशिक्षण प्रबोधिनी, जालना रोड, औरंगाबाद येथे हजर राहीलो होतो. सुणावणी वेळी वक्फ मंडळ, औरंगाबाद येथील कर्मचारी श्री. असिफ हे तेथे हजर होते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे समोर सुनावणी संपल्यावर ऍड. निसार अहेमदखान तेथुन निघुन गेल्यानंतर मी व सुफियान पटेल असे श्री. असिफ यांना सुनावणी संदर्भाने निकाल केव्हा होईल याबाबत विचारले असता श्री.असिफ हे मला म्हणाले की, तुम्हाला जर तुमच्या बाजुने निकाल लावुन घ्यायचा असेल तर मी सांगतो त्या व्यक्तीला भेटा तुमचे काम होऊन जाईल असे म्हणुन एका इसमास बोलावुन घेवुन त्यांची ओळख फैसल अशी करून देवुन श्री. असिफ तेथुन निघुन गेले. तेव्हा वावे वडखल मस्जिदबाबत निकाल तुमचे बाजुने लावुन देणेकामी श्री. असिफ यांना सांगुन मदत करतो असे म्हणुन श्री. फैसल यांनी 60,000/- रूपयाची मागणी केली होती. त्यानंतर श्री. फैसल यांना आम्ही पुढचेवेळी आल्यावर भेटतो असे म्हणुन निघुन गेलो. मला श्री.असिफ व श्री. फैसल यांना लाच देण्याची इच्छा नाही. तसेच त्यांचेशी माझी कोणतीही वैरदुष्मनी नाही किंवा देणे घेण्याचा अगर उसनवारीचा व्यवहार नाही. आज दिनांक 24/03/2022 रोजी श्री.असिफ व श्री. फैसल यांना भेटण्यासाठी मी व सुफियान पटेल असे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पाणचक्की, औरंगाबाद येथे जाणार आहे. तेव्हा श्री. असिफ व श्री. फैसल यांना आम्ही वावे वडखल ता. पेन जि. रायगड मस्जिदबाबत व्यवस्थापकीय समितीची फेर बदल बाबत चालु असलेल्या वादाची सुनावणीचे निकालाबाबत विचारपुस करणार आहे. त्यावेळी श्री. असिफ व श्री. फैसल यांनी माझ्याकडे 60,000/- रूपये लाचेची मागणी करून लाचेची रक्कम स्वत: किंवा इतरामार्फत स्विकारल्यानंतर त्यांना पकडुन कायदेशिर कारवाई करावी हि विनंती.अशी तक्रार दिली होती.माझे तक्रारीचे अनुषंगाने पडताळणी करणेकामी शासकीय दोन पंचांना पोलीस निरीक्षक श्री. हनुमंत वारे यांनी दिनांक 24/03/2022 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय येथे बोलावुन त्यांचा ओळख परिचय करून देवुन त्यांची नावे 1) श्री. दिपक गोविंदराव देशमुख, निमतनदार, भूमी अभिलेख प्रशिक्षण प्रबोधनी, औरंगाबाद 2) श्री. शेख जमीर शेख अजमेर,

शिरस्तेदार, भूमी अभिलेख प्रशिक्षण प्रबोधनी, औरंगाबाद असे असल्याचे सांगितले. मी माझी तक्रार पंचांना तोंडी सांगितली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. वारे यांनी माझी टकलिखीत दिलेली तक्रार पंचांना वाचण्यास दिली. पंचांनी ती वाचल्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. वारे व पंचांनी सदर तक्रारीवर सह्या केल्या. त्यानंतर श्री.असिफ व श्री. फैसल यांना भेटण्यासाठी मी व सुफियान पटेल असे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पाणचक्की, औरंगाबाद येथे जाणार असल्याने तेथे जावुन लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय पोलीस निरीक्षक श्री. वारे यांनी माझे व पंचांचे संमतीने घेतला. त्यावरून पोलीस निरीक्षक श्री. वारे यांचे सुचनेप्रमाणे मी, सुफियान पटेल व पंच क्र. 1 श्री. देशमुख असे खाजगी कारने तर पोलीस निरीक्षक श्री. वारे, सापळा पथक व पंच क्र. 2 श्री. शेख जमीर असे शासकीय वाहनाने निघुन पाणचक्कीचे अलीकडे सुरक्षित ठिकाणी थांबलो. तेथे पोलीस निरीक्षक श्री. वारे यांनी योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर सुफीयान यांनी फैजल यांना मोबाईलवर संपर्क केला असता थोड्या वेळात येतो असे म्हणाले. त्यानंतर काही वेळाने सुफियान यांनी परत श्री. फैजल यांना मोबालवर संपर्क केला असता त्यांनी ते वक्फ कार्यालयात आले असल्याचे सांगतिले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. वारे यांनी आम्हाला थोडक्यात सुचना देवुन व्हाईस रेकर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकर्डर चालु करून माझे जवळ दिले. मी, सुफियान व पंच क्र.1 श्री. देशमुख असे खाजगी कार क्रमांक एम.एच 47 ए.एन 0228 ने जावुन श्री. फैसल यांची वक्फ मंडळ कार्यालयाचे आवारात भेट घेतली असता श्री. फैसल यांनी माझ्याकडे वावे वडखल ता. पेन जि. रायगड येथील मस्जिदचे व्यवस्थापकीय समितीची फेर बदल बाबत महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांचेकडे चालु असलेल्या प्रकरणात निकाल आमचे बाजुने लावुन देणेकामी श्री. असिफ यांना सांगुन मदत करतो असे म्हणुन 60,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती 50,000/- रूपये स्विकारण्याचे पंचासमक्ष मान्य केले. त्यानंतर श्री. फैसल यांनी माझी व पंच क्र. 1 श्री. देशमुख यांची वक्फ मंडळ येथील श्री. असिफ यांची भेट घालुन दिली. वावे वडखल ता. पेन जि. रायगड मस्जिदबाबत व्यवस्थापकीय समितीची फेर बदल बाबत चालु असलेल्या वाद प्रकरणात पंचासमक्ष चर्चा झाली. तेव्हा शेवटी मी, श्री. असिफ यांना म्हणालो की, त्यांनी सांगितलेल्या पैकी काही कमी झाले तर बरे होईल, त्यावर श्री. असिफ मला म्हणाले की, तुम्ही काय बोलताय ते मला काही समजत नाही. त्यानंतर लगेच फैसल यांनी आवाज नाही येत चला चला असे म्हणुन मला व पंच श्री. देशमुख यांना वक्फ मंडळ कार्यालयाचे बाहेर बेस टी कफी हटेल येथे घेवुन आले. तेव्हाही परत श्री. फैसल यांनी 50,000/- रूपये लाचेची मागणी करून लाचेची रक्कम लगेचच तेथे घेवुन बोलवीले. त्यानंतर सुफियान पटेल हे फैसल यांचेसोबत थांबले. मी व पंच क्र. 1 श्री. देशमुख असे खाजगी कारने सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. त्यावरून श्री. फैसल यांचेविरूध्द सापळा लावण्याचा निर्णय माझ्या व पंचांच्या संमतीने पोलीस निरीक्षक श्री. वारे यांनी घेतला.पोलीस निरीक्षक श्री. वारे यांनी मला, सापळा पथकास व दोन्ही पंचास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. तेव्हा श्री. फैसल यांना लाच म्हणुन देण्याकरीता 500/- रूपये दराच्या 100 चलनी नोटा मी हजर केल्या. त्यावेळी मला व पंचांना ऍ○न्थ्रासिन पावडरच्या गुणधर्माबाबत प्रात्यक्षिक करून दाखविले. मी हजर केलेल्या नोटांना ऍ○न्थ्रासीन पावडर लावुन माझे पन्टचे समोरील उजव्या बाजुचे खिशात ठेवण्यात आल्या. व्हाईस रेकर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकर्डर चालु करून माझेकडे देण्यात आले. पोलीस निरीक्षक श्री. वारे यांचे सुचनेप्रमाणे मी, पंच क्र.1 श्री. देशमुख यांना सोबत घेवुन खाजगी कारने वक्फ मंडळ, पाणचक्की जवळील बेस टी कफी हटेल येथे गेलो. तेथे सुफियान पटेल बसलेले होते. पाठोपाठ पोलीस निरीक्षक श्री. वारे, सापळा पथक व पंच क्र.2 श्री. शेख जमीर असे येवुन कोणास संशय येणार नाही अशा रीतीने सापळा लावुन थांबले. थोड्याच वेळात श्री. फैसल तेथे आले. माझी श्री. फैसल यांचेशी थोडावेळ चर्चा झालेनंतर मागणी प्रमाणे 50,000/- रूपये लाचेची रक्कम माझेकडुन श्री. फैसल यांनी स्वत: स्विकारली. परंतु फैसल यांना काहीतरी संशय आल्याने स्विकारलेली रक्कम ते सुफियान पटेल यांचेकडे देवु लागले असता सुफियान पटेल यांनी ती रक्कम न घेतल्याने श्री. फैसल यांनी ती रक्कम जमीनीवर टाकली. त्यानंतर मी 17.35 वाजेच्या सुमारास पुर्वनियोजीत इशारा करताच पोलीस निरीक्षक श्री. वारे, सापळा पथक, पंच क्र.2 श्री. शेख जमीर यांचेसह तेथे हजर आले. त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री. वारे यांनी श्री. फैसल यांना ओळख परिचय देवुन त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव फैसल मोहमद इकबाल, वय- 43 वर्षे, व्यवसाय- खाजगी नोकरी रा.प्लट नं 100, अन्सार कलनी, पडेगाव, औरंगाबाद असे सांगितले. लाचेची रक्कम 50,000/- रूपये पंचासमक्ष जप्त करण्यात आली असुन सदर नोटांचे क्रमांक व वर्णन मी हजर केलेल्या नोटांशी तंतोतंत जुळुन आले आहे. अशा प्रकारे दिनांक 24/03/2022 रोजी श्री. फैसल मोहमद इकबाल, वय- 43 वर्षे, व्यवसाय- खाजगी नोकरी रा.प्लट नं 100, अन्सार कलनी, पडेगाव, औरंगाबाद यांनी माझ्याकडे वावे वडखल ता. पेन जि. रायगड येथील मस्जिदचे व्यवस्थापकीय समितीची फेर बदल बाबत महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांचेकडे चालु असलेल्या प्रकरणात निकाल आमचे बाजुने लावुन देणेकामी श्री. असिफ यांना सांगुन मदत करतो असे म्हणुन 60,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती 50,000/- रूपये स्विकारण्याचे पंचासमक्ष मान्य केले. मागणी प्रमाणे 50,000/- रूपये लाचेची रक्कम 17.35 वाजता बेस टी कफे हटेल समोर, पाणचक्की जवळ, औरंगाबाद येथे पंचासमक्ष माझेकडुन श्री. फैसल इकबाल यांनी स्वत: स्विकारली आहे, म्हणुन माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे. समक्ष हि फिर्याद दिली

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): SHARAD NATHA INGLE(I (Inspector)) / 12345 **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा): — I.d IRFAN NAIK

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ड्युटी अधिकारी

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name (नाव):** SHARAD NATHA INGLE

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** 12345